महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उसानपरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.: विकाऔ/आस्था-३/२०२३/ 1853 दिनांक: 28 APR 202

## महत्वाचे परिपत्रक

प्रति
**प्राचार्य,**
**शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद**
**उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रा. का., औरंगाबाद**
**प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड, जिंतूर, हिंगोली, नांदेड,बीड, उस्मानाबाद पु.ला.शा.तं.नि. लातूर, महिला निवासी, शा.तं.नि लातूर**

**विषयः** भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांचे ठेव संलग्न विमा योजनाबाबतचे प्रदाने...
**संदर्भः** मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांचे पत्र क्र. तंशिसं/अर्थसं/ठेंसयो निधी/२०२३/५३ दि. १७-०४-२०२३

उपरोक्त संदर्भिय विषयी कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. भनिनि /प्र.क्र. १३३/१२/१३-अ, दि.१५-०१-२०१३ अन्वये भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांसाठी ठेव संलग्न विमा योजनेमध्ये सुधारणेबाबत आदेश निर्गमीत केले आहेत. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी १९९८ मधील नियम ३० च्या अटी व शर्ती प्रमाणे ठेव संलग्न विमा योजनेची अंमलबजावणी करण्याचे शासन निर्देश आहेत.

वर्गणीदारांच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसास लाभाच्या रक्कमांचे प्रदान करण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावामध्ये नमुद माहितीमध्ये त्रुटी व विसंगती आढळून येते याबाबतच्या प्रस्तावामध्ये सुसुत्रता आणण्याचे दृष्टींने व अशा प्रकरणी संचालनालयामार्फत तरतुद करुन देणेबाबत संचालनालयाकडून सोबतचे विवरणपत्र पाठविले आहे.

वर्गणीदाराचा सेवेत असतांना मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसास लाभाच्या रक्कमांचे प्रदान करण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावामध्ये सोबतच्या विवरणपत्रात माहिती भरुन प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासह वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात यावा, जेणे करुन याबाबत अनावश्यक पत्रव्यवहार टाळणे शक्य होईल.

सोबतः विवरणपत्र

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः- १) मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहिती व संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.

***\\dataserver\SonarSir\SSS Estt\circular 2022.doc\54***

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४१५/४
Email ID : desk15@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

---

**परिपत्रक** 25 APR 2023 आवक क्र. 3102

क्रमांक: १५/अर्थसं/ठेंसयो-निधी /२०२३/ ५३
दिनांक : 17 APR 2023

विषय :- भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांचे ठेव संलग्न विमा योजनाबाबतचे प्रदाने.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भनिनि-१०१२/२५/प्र.क्र.१३३/१२/१३-अ, दि.१५/०१/२०१३ अन्वये भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीदारांसाठी ठेव संलग्न विमा योजनेमध्ये सुधारणेबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत. महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी १९९८ मधील नियम ३० च्या अटी व शर्ती प्रमाणे ठेव संलग्न विमा योजनेची अंमलबजावणी करण्याचे शासन निर्देश आहेत.

संचालनालयाच्या अधिनस्त तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, शासकीय संस्था व अशासकीय अनुदानित संस्था यामधील भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांच्या मृत्युनंतर त्यांच्या नामनिर्देशित वारसास ठेव संलग्न विमा योजनेच्या लाभाची रक्कम मिळण्याकरीता विभागीय कार्यालयामार्फत संबंधीतांचे प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येत आहेत. परंतू विभागीय कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावामधील नमूद माहितीमध्ये व आवश्यक कागदपत्रामध्ये त्रुटी व तफावती आढळून येतात. विभागीय कार्यालयामार्फत सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने सोबत जोडलेल्या विवरणपत्रात माहिती प्राप्त करुन त्यासोबत आवश्यक कागदपत्रांसह संबंधितांचे प्रस्ताव या संचालनालयास सादर करावे. विभागीय कार्यालयाने प्रस्तावाची छाननी करुन परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावे.

सोबत :- विवरणपत्र

(डॉ. धनपाल कांबळे)
उपसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

प्रत :- माहिती व पूढील योग्य कार्यवाहीकरीता.

१. सहसंचालक, तंत्रिशक्षण विभागीय कार्यालये, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थाना कळविण्यात यावे.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.